# Rotary Club of Pune Sahawas
RI District 3131 I Club No. 83055

THE MAGIC OF ROTARY

THE FEELING OF TOGETHERNESS
ROTARY CLUB OF PUNE SAHAWAS

# मैत्र

जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीं रती वाढो।
भूतां परस्परें जडो। मैत्र जीवांचे II

President :
Rtn. Nivedita Mulay
Mob : 97658 16040
nipurtn@gmail.com

Secretary :
Rtn. Vivek Joshi
Mob : 90110 22583
Joshi.vvivek@gmail.com

Club Admin :
Rtn. Ajay Mutatkar
Mob : 84509 79679
ajaymutatkar@gmail.com

Team Maitra :
Rtn. Atul Joshi
Mob : 98812 98198

Ann Shweta Baraskar
Mob : 98905 66188

Ann Mugdha Gokhale
Mob. : 98814 67896

Editor :
Rtn. Sameer Kulkarni
Mob : 98504 01772
sameer@mail.usa.com

Year : 15/ Edition : 3 | August, 2024 | For Internal Distribution

## From the Desk of President



**सर्वांना गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा !!!**

हा ऑगस्ट महिना देखील भरगच्च कार्यक्रमांनी सजलेला होता. आपण खूप छान छान कार्यक्रम केले.

२ ऑगस्ट ला Know Your Rotarian ह्या नवीन उपक्रमा अंतर्गत रो. महेश व सुचेता ससर्षी ह्यांची मुलाखत आयोजित केली होती. श्री अजित जोशी यांनी त्यांची खूप खुमासदार रीतीने मुलाखत घेतली. ह्या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे की आपल्या सभासदांना जाणून घेणे. ह्यामुळे सभासदांची एकमेकांशी चांगली ओळख होते. नवीन सभासदांना क्लब मध्ये रुळायला मदत होते.

**४ ऑगस्ट रोजी District च्या Mega Tree Plantation मध्ये आपण Co-Host** म्हणून सहभागी झालो होतो. देहू येथे श्री. संदीप सोनिग्रा यांनी गाथा ग्राम येथे हा वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित केला होता. १५००० झाडे लावण्याचा हा संकल्प होता. मुसळधार पावसात देखील आपल्या सर्व सभासदांनी उत्साहाने झाडे लावली. आमची एकप्रकारे वर्षा सहल देखील झाली.

९ ऑगस्ट रोजी International Services च्या अंतर्गत District International Services Director रो. उज्ज्वला बर्वे व Chair person रो. दीप्ती सिधये यांनी हा विषय छान interesting पद्धतीने समजावून सांगितला.

१६ ऑगस्ट रोजी क्लब मध्ये **"जागर मंगळागौरीचा"** हा बहारदार कार्यक्रम झाला. आपल्या मैत्रिणींनी मंगळागौरीचे खेळ खूप छान सादर केले. हॉल ची सजावट तर अत्यंत दिमाखदार होती. सहवास Club च्या इतिहासात हा आतापर्यंतचा सर्वात सुंदर व दिमाखदार कार्यक्रम झाला. ह्या कार्यक्रमासाठी रो. दिनकर यांनी Ann श्रध्दा च्या ५०व्या वाढदिवस बद्दल अर्थ सहाय्य केले. त्यांना खूप खूप धन्यवाद.

Women In Rotary च्या अंतर्गत Chat -GPT चा Online सेशन झाला. तो पण खूप माहितीपूर्ण होता. Women In Rotary चे पूर्ण वर्षाचे Schedule दिले आहे. सर्व मैत्रिणींनी ते आवर्जून बघावे व त्याचा लाभ घ्यावा.

आपल्या ३ इंटरॅक्ट शाळांमध्ये इंस्टॉलेशनचा समारंभ खूप छान पार पडला. ह्या वेळेचे वैशिष्ट्य म्हणजे तिन्ही शाळांना रो. दिनकर यांनी e - learning kits दान केले. तसेच तीनही शाळांमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून आपल्याच Club चे मेम्बर्सना आमंत्रित केले होते. ह्या साठी Youth Director रो. दिनकरला धन्यवाद.

दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी १९ ऑगस्ट ला पॅराप्लेजिक सेंटर येथे भेट देऊन तेथील सैनिकांना राखी बांधून सैनिकांप्रती आदर व्यक्त केला.

मला सांगायला खूप आनंद होतो आहे कि यावर्षी २५ ऑगस्टच्या **Membership Seminar मध्ये RCP Sahawas ला ४ मानाची Platinum कॅटेगरी मधील अवॉर्ड्स मिळाली.** त्यासाठी सर्व सभासदांनां खूप खूप धन्यवाद.



# From the Desk of President

३० ऑगस्ट रोजी RCP सहवास ने आणखीन एक दिमाखदार कार्यक्रम आयोजित केला होता. शुक्रांगणचा यावर्षीचा पहिल्या कार्यक्रमाचे यजमान पद रोटरी क्लब ऑफ पुणे सहवास ने भूषवले. ११ Clubs नी एकत्र मिळून हा कार्यक्रम केला. सर्वाना सुपरिचित असे श्री. समीर लिमये हे आपल्याला प्रमुख वक्ते लाभले. "समर्थांचे नेटवर्किंग" हा कार्यक्रम खूपच सुंदर झाला.

कार्यक्रमाला २२० श्रोत्यांची उपस्थिती होती. DG रो. शीतल शहा व Vocational Director रो. मधुमिता बर्वे उपस्थित होत्या. श्री. समीर लिमये यांना आपण Vocational Service Excellence Award दिले. यासाठी Admin Director रो. अजय मुटाटकर यांनी पुढाकार घेतला. त्यांना खूप खूप धन्यवाद.

August महिना Youth Director रो. दिनकर पळसकर , Event Director रो. तृप्ती भिडे , Admin Director रो. अजय मुटाटकर व त्यांना साथ देणाऱ्या त्यांच्या Team यांनी गाजविला.

१ सप्टेंबरला आपण भवताल ग्रुप बरोबर, गिनी देवी मित्तल शाळेमध्ये गणपतीची मूर्ती बनवण्याची कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेचा १५० मुलांनी लाभ घेतला व बाप्पाची मूर्ती बनवण्याचे प्रशिक्षण घेतले. मुलांचा उत्साह, Creativity अगदी वाखाणण्या सारखी होती. रो. सुनील बारस्कर यांनी यात पुढाकार घेतला.

हे सर्व आपल्या सभासदांच्या उत्तम सहकार्यानेच पार पडत आहे. त्यासाठी मी सर्वांना खूप खूप धन्यवाद देते. तुम्हा सर्वांचे असेच सहकार्य मिळत राहील अशी आशा करते.

पुढील काही महिन्यात असेच छान छान प्रोजेक्ट्स, कार्यक्रम असणार आहेत. त्याची जोरदार तयारी सुरु आहे.

सर्वांना उत्तम आरोग्य, सुख,शांती लाभो अशी बाप्पाजवळ प्रार्थना.

येणारा गणेशोत्सव आपण सर्वांना आनंददायी जाओ ही सदिच्छा ...

**रो. निवेदिता मुळे**
**प्रेसिडेंट, RCP सहवास**

---

# Artificial Modular Limbs Donation Project :

RCP Sahawas has undertaken various projects this RY 24-25 year. District 3131 has suggested 11 projects.

**We feel grateful and proud that Rtn. Sameer Kulkarni through his company One Network has supported with Rs. 2.5 lakhs for district's 10 projects.**

**Rtn. Ajay Mutatkar has donated Rs. 10,000/- for Chatrachaya Project which is one of the 11 projects.**

Apart from 11 projects suggested by District 3131, we have also undertaken one long lasting and impactful project of donating Artificial Modular Limbs to amputees.

We are very happy to announce that we received a overwhelming response to this project through ISR & CSR .

**In total we will be donating 101 Artificial Modular limbs.**

This project has completed Project identification, Project planning, Fund raising and now is entering Project execution stage which will be completed by 27 th Oct 24.

It is a pleasure to mention that the project of Artificial Modular Limbs have been supported by many of our members and their friends and relatives who are non-Rotarians under **Individual Social Responsibility (ISR).**

**We received donations from Members for 25 nos. of Artifitial Limbs.**

**Also Rtn. Sameer Kulkarni through One Network has supported with 3.85 lakhs for 26 Artificial Limbs and support activities.**

**An another CSR partner company Bericap whose CEO is relative of Rtn. Chitte has donated for 50 nos of Artifitial Limbs.**

We are grateful to all for supporting this noble project.




**Rtn. Nivedita Mulay**
**President, RCP Sahawas**

# Service Projects :

## महा वृक्षारोपण उपक्रम

दिनांक ४ ऑगस्ट २०२४ रविवारी गाथाग्राम, देहू इथे रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ च्या सपोर्टिंग द एन्व्हायरमेंट अवेन्यू व एव्हो ग्रीन सिटीचे श्री संदीप सोनिग्रा यांच्या सहकार्याने महा वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित केला होता. संत तुकाराम महाराजांच्या वास्तव्याने पावन झालेल्या देहुगावात इंद्रायणी नदीच्या काठी निसर्गरम्य परिसरात वसत असलेल्या एव्हो ग्रीन सिटीकडे जाण्यासाठी रोटरी सहवासचे आम्ही सभासद सकाळी साडेसहालाच रवाना झालो.

जोरदार पडत असलेल्या पावसातही इव्हो ग्रीन सिटीच्या साईटवर डिस्ट्रिक्टच्या विविध रोटरी क्लब मधून रोटेरियन, ऍन , ऍनेट्स , तसेच अनेक इंटरॅक्टस , रोटरॅक्टस व ग्रामस्थ उपस्थित झाले होते.

मिसळपाव व जिलेबी च्या झक्कास नाश्त्यावर ताव मारून मुसळधार पावसात गरम चहाचा आस्वाद सगळ्यांनी घेतल्यावर कार्यक्रमाला सुरुवात झाली. कार्यक्रमाला DG रो. शीतल शहा, इव्हो ग्रीन सिटीचे श्री. संदीप सोनिग्रा, वृक्षमित्र रो. सराफ , एन्व्हायरमेंट अवेन्यूचे डिस्ट्रिक्ट डायरेक्टर रो. माळुंजकर यांची विशेष उपस्थिती होती.

आपला क्लब RCP Sahawas हाही या कार्यक्रमाचा को-होस्ट होता. त्यामुळे होस्ट बरोबर आपल्याचे क्लब चे कौतुक झाले. क्लबच्या वतीने प्रे. रो. निवेदिता मुळे यांनी सन्मान स्वीकारला.

सर्व प्रमुख पाहुण्यांच्या मनोगताने वृक्षारोपणाचा कार्यक्रम सुरु झाला. प्रथम झाडे लावण्याची शास्त्र शुद्ध प्रक्रिया समजावून सांगण्यात आली . झाडांची रोपे घेऊन दिलेल्या जागेवर छोटा खड्डा खोदुन त्यात रोप लावायचे होते . सर्व साहित्य इव्हो सिटी ग्रुपने उपलब्ध करून दिली होती . सर्वांनी भर पावसात जवळच्या परिसरात उत्साहाने वृक्षारोपण केले. इव्हो सिटी ग्रुप या रोपांची काळजी घेऊन झाडांना वाढवतील. आपण सहली करता तेथे केव्हाही जाऊन आपण लावलेली झाडे बघू शकतो व समाधान व आनंद अनुभवू शकतो. या वृक्षरोपणाच्या निमित्ताने या समाधान व आनंदाबरोबरच एक छोटी वर्षासहलही झाली .

या कार्यक्रमात प्रे. रो. निवेदिता बरोबर सेक्रेटरी रो. विवेक, डायरेक्टर सर्विस प्रॉजेक्ट रो. सुधीर व ट्रेजरर रो. सुप्रिया वैद्य, रो. स्वाती कोठाडिया , रो. जयश्री धुपकर, PE रो. रुमा आगवेकर , रो.नितीन टिळक, रो. राहुल लाळे , रो. अपर्णा शहा, ऍन संगीता पंडित सहभागी झाले होते.

**रो. राहुल लाळे**

**PI Director RCP Sahawas**











# Service Projects :

## Paraplegic Rehab Center ला भेट

दरवर्षी प्रमाणे यंदा ही आपल्या क्लब मधील सदस्यांनी दिनांक 19 ऑगस्ट, 2024 ला Paraplegic Center ला भेट देऊन, तेथील जवानांना राखी बांधून रक्षाबंधन सण मोठ्या उत्साहात साजरा केला. रो. आनंद देशपांडे यांच्या तर्फे सर्व जवानांना चिवडा - लाडू च्या Packets चे वाटप केले. तसेच प्रेसिडेंट रो. निवेदिताने पेढे व Ann संगीता ने राख्या आणल्या होत्या.

जवानांना राखी बांधायला मिळणे ही खरोखरच अभिमानाची गोष्ट आहे. हे जवान सीमेवर राहून, युद्ध करून आपले रक्षण करतात. म्हणून आपण आपले जीवन सुखाने जगू शकतो. याचे आपण कायम स्मरण ठेवले पाहिजे. या कार्यक्रमाला रो. विवेक जोशी, रो. आनंद देशपांडे, रो. पुरुषोत्तम, अजित जोशी, PE रो. रुमा, रो. स्वाती कोठडिया, Ann संगीता, रो. अपर्णा शहा, Annet पूजा कोठडिया, Ann पल्लवी हे सभासद आवर्जून उपस्थित होते. सर्वांना धन्यवाद.

भारतीय नागरिकाचा घास रोज अडतो ओठी,<br>
सैनिक हो तुमच्यासाठी, सैनिक हो तुमच्या साठी....

**रो. निवेदिता मुळे**<br>
**प्रेसिडेंट, RCP सहवास**





# Interact activities :

## Interact Installation

10th August, a nice ceremony of Interact Installation was held at Danyanada Prashala, Kirkatwadi. It was well organised & planned by Youth Director Rtn. Dinkar Palaskar. Principal Mr. Khune Sir, President Nivedita Mulay expressed their views about the Interact Activities.
Youth Director Rtn. Dinkar also interacted with the students. Chief Guest Annet Rohan Patwardhan's speech was very interactive. He told students the importance of knowledge and guided them to persuade hobbies and cultivate habit of giving back to society.
In this program Rtn. Dinkar donated E-learning kit to the school on occasion of 50th birthday of Ann. Shraddha. For this Rtn. Pankaj Patel of RCP Fare-east helped through their CSR fund. Thank you Rtn. Dinkar.
Rtn. Ruma handled the anchoring very well. Rtn. Vivek Joshi, Ann Shraddha Palaskar, Ann Pooja Kulkarni, Rtn. Manisha, Rtn. Aparna Shah, Ann Supriya Patwardhan along with Guests Mr. & Mrs. Joshi were present for the programme.

**Rtn. Nivedita Mulay.**
**President**
**RCP Sahawas**





# Interact activities :

## Interact Installation

On Wednesday, 14th August, 2024 Interact Installation was held at Ginni Devi Mittal School, Ambegaon. It was also well organised & planned by Youth Director Rtn. Dinkar Palaskar & Rtn. Sunil Baraskar.

Chief Guest Rtn. Sameer Kulkarni delivered a very interactive speech. His way of educating the students was very impressive. Through some simple science experiments he explained how students should be eager to acquire the knowledge from teachers.

Rtn. Sameer Kulkarni has also agreed to get 7 computers repaired for the school. In this program Rtn. Dinkar donated E-learning kit to the school on occasion of 50th birthday of Ann. Shraddha. For this Rtn. Pankaj Patel of RCP Fare-east helped through their CSR fund. Thank you Rtn. Dinkar.

Rtn. Sunil Barskar handled all logistic arrangements. PE Rtn. Ruma, Ann Shradha Palaskar, Rtn. Swati Kothadiya were present for this programme.

**Rtn. Nivedita Mulay.**
**President, RCP Sahawas**







# Interact activities :

## Interact Installation

20th August, 2024 मातोश्री सोनाबाई देडगे, रुळे येथे Interact Installation चा कार्यक्रम खूप छान पार पडला. Youth Director रो. दिनकर पळसकर यांनी उत्तम नियोजन करून कार्यक्रमाची आखणी केली होती. गावातील शाळा असून ही मुलांमध्ये शिस्त, त्यांच्यामधील उत्साह दिसून येत होता.

प्रमुख पाहुण्या रो. जयश्री घुपकर यांनी छान विद्यार्यांशी संवाद साधत त्यांना मार्गदर्शन केले. छोट्या छोट्या गोष्टी सांगून त्यांनी मुलांना कसा अभ्यास करावा, चांगले गुण अंगी कसे बाणावेत ह्या विषयी सांगितले. Ann वर्षा कुलकर्णी ने रो. जयश्री ताईंची छान ओळख करून दिली. रो. दिनकर ने interact विषयी छोटे क्विझ घेऊन कार्यक्रमात रंगत आणली. Ann श्रद्धा पळसकर हीचा ५० वा वाढदिवस शाळेमध्ये छान साजरा झाला. श्रद्धाच्या वाढदिवसानिमित्त रो. दिनकर ने शाळेला E- Learning kit प्रदान केले. प्रेसिडेंट रो. निवेदिता व Ann श्रद्धाच्या हस्ते तिथे काही रोपे लावण्यात आली. रो. दिनकरच्या Palsai Batteries चा पूर्ण staff कार्यक्रमास उपस्थित होता. रो. पुरुषोत्तम, Ann वर्षा कुलकर्णी हे देखील आवर्जून उपस्थित होते. सर्वांना खूप खूप धन्यवाद .

तिथून नंतर जवळच एका सुंदर रिसॉर्ट मध्ये रो. दिनकरने आम्हा सर्वांच्या भोजनाची छान व्यवस्था केली होती. पाऊस पण पडत होता. सुंदर , नयनरम्य असे दृश्य होते. अशी आमची छोटी वर्षा सहल ही झाली. धन्यवाद रो. दिनकर.

**रो. निवेदिता मुळे**
**प्रेसिडेंट, RCP सहवास**








# Interact activities :

## Ganapati Idol making workshop

It was a great Ganapati Idol making workshop organised by Rotary Club of Pune Sahawas with the help Rtn. Sunil Baraskar from Tyagi Properties and Mittal group of construction & Bhavatal Team.
There were around 150 children participated in this workshop. The whole campus was full of kids having full of energy, enthusiasm, excitement.
It was a thrill to see talent in kids and the concentration & dedication they displayed while completing the idol.
You will see in the photos a young artist Morya Shinde made 4 beautiful Ganapati idols in the given time.
Students from our Interact school and Interact BOD of Ginni devi Mittal School also participated in the workshop.
Rtn. Sunil Baraskar took lot of efforts in organising this workshop.Thanks Sunil ji.
Rtn. Shekhar Takalkar's Grand Daughter Kavya along with her friend Soumya also participated in the workshop. They enjoyed a lot.

Rtn. Nivedita Mulay
President
RCP Sahawas





# Weekly Meetings :

## रुबरु....याने...आमने सामने..

AUGUST being the Membership month of Rotary International, we decided to commemorate the month by सीधी बात with our Member in our Friday Fellowship Meeting in program रुबरु.

As we are all aware KYC is the cornerstone of any successful business venture. So is knowing your family, friend, neighbour for any individual or institution. In order to further consolidate the SAHAWAS, Rtn. Mahesh Saptarshi & Ann. Sucheta were introduced in रुबरु on 2nd August and it was all pride and pleasure to know the path traversed by Saptarshi family in life, education, career, business and ROTARY. ..

Needless to add, it was all inspiring, educative and motivating for all listening audiences to know as to how Saptarshis navigated the ups & down, highs & lows with courage and determination.

A Man's achievements are made possible by the support and work of their wife. The Saptarshi couple was a perfect example of हम साथ...साथ है. Kudos to Mahesh & Sucheta.

Takeaways from Saptarshi's सीधी बात - Education, alone, can never be the benchmark of any successful career. It's all about knowing your inner strength and capabilities. There is everything available there you dream about... Fame, money, popularity exploring the whole world..Are you Ready ?

Anna. Ajit Joshi must be complimented for making Saptarshi comfortable and open all about them. Nice job.. Ajit.. Keep it up.. Last but not the least, thanks to our entire Club Admin team including fellowship team for designing and executing innovative program ideas and delicious food too.....

काश ऐसा हो, तेरे कदमो से...
चुन के मंजिल चले, और कही दूर कही...
तुम गर साथ हो, मंजिलो की कमी तो नही...

**Rtn. Ajay Mutatkar**
**Club Admin Director, RCP Sahawas.**



# Weekly Meetings :

## Friday Fellowship with District International Service Team....

• Who is Aung San Kuu Kyo... * Tuktuk is famous transport mode from which country.... * Barritose is popular dish... from... * Three Capitals in One country...

These were few questions asked in QUIZ on International awareness conducted with professional finnese by Rtn. Deepti Sidhaye that took RCP Sahawas's Friday Fellowship meeting on 9th, August on International ride, full of information & entertainment enjoyed by one and all. Full marks to all Sahawasiy for answering all questions. When International Travels & Tours have become norms in Indian household, it's critical to understand and appreciate the diversity among nations/societies etc. Going further we understand how important the role of Equity & Inclusivity is in this conflicting world. ROTARY is playing it's small but significant role in strengtheningDEI. Rtn. Ujjwala Barve in her emphatic presentations underscored various Rotary Initiative like Fellowship and Rotary Action Groups that bring people with common interest together to execute projects locally and globally too. The kind of fellowship RI has is mind boggling and unbelievable but this is where RI plays it's important role. Hundreds of Fellowship are there for enthusiastic Rotarians like - Metaverse, Military Veterans, Scuba, Surfing, Urban Gardening, Beards & Moustache, LGBT, Magicians etc etc... The Minimum qualifications to start Fellowship here is 25 members from 5 different countries.

Takeaway from Rtn. Ujjwala's talks was her poignant remark is to know any country/community is to understand their language really well. Can you know India by traffic jam, infrastructure bottleneck, uncleanness etc, there is much more to INDIA than what appears on the ground.

Kudos to Ujjwala & Deepti for excellent presentation...

Overall, an engaging, interesting Evening of Rotary Fellowship. Thanks President Rtn. Nivedita Mulay and her Team Sahawas. Would like to Thank Shobha Nahar and Shree Joshi for their Introduction & Thanks Giving...

ये कश्ती वाला क्या गा रहा था...

कोई इसे भी याद आ रहा था...

दो लफ्जो की है ये जिंदगानी..

या है मोहब्बत...या है जवानी...

**Rtn. Ajay Mutatkar**
**Club Admin Director, RCP Sahawas.**



# Weekly Meetings :

## "जागर मंगळागौरीचा"

!!श्रावण मासी हर्ष मानसी!! 16th August, 2024. जागर मंगळागौरीचा कार्यक्रम अप्रतिम झाला.
हॉलला केलेल्या सुंदर सजावटीने कार्यक्रम अत्यंत देखणा झाला. स्वागताला अपर्णा मुटाटकर, वर्षा कुलकर्णी छान नटून हळदी - कुंकू, अत्तर, फुटाणे देत होत्या.त्यांच्या प्रत्येक गोष्टींमध्ये कलात्मकता दिसून आली.
आपल्या कार्यक्रमाला Distric Cultural Director रो. वैशाली वेरणेकर आवर्जून उपस्थित होत्या. रो. गौरी शिकारपुर यांनी छान सूत्र संचालन केले. सणांची, विविध व्रतांची खूप छान माहिती दिली.
त्यानंतर आपल्या उत्साही Anns नी अतिशय सुंदर मंगळागौरीचे खेळ सादर केले. जुन्या - नव्या खेळाचा मिलाप करून अतिशय सुंदर सादरीकरण केले.. मध्ये थोडावेळ light गेल्यामुळे खंड पडला. पण त्या समर प्रसंगी, Rtn. Ravi Gokhale, Rtn. Vivek Gokhale यांनी तो प्रॉब्लेम त्वरित solve केला व पुढील कार्यक्रमाला सुरुवात झाली. धन्यवाद विवेक जी , रवी जी. रो. गौरी ताईंनी मध्ये उपस्थितांना छोटे छोटे छान प्रश्न विचारले. त्यामुळे कार्यक्रम रंगत गेला.. Gents नी पण त्यात भाग घेतला होता. त्यामुळे प्रोग्रामला कौटुंबिक स्वरूप आले.
Best Costume चे बक्षीस रो. स्वाती कोठडीया ने पटकावले. Best उखाणा चे बक्षीस Ann मुग्धाला मिळाले. तिने स्वरचित उखाणा सादर केला.
तृप्ती, अपर्णा शहा आणि संगीताला Dist. Cultural Director Rtn. Vashali कडून specialबक्षीस मिळाले....
Gents मध्ये, अजित जोशी,यांनी तत्पर स्वरचित कार्यक्रमाला साजेसा उखाणा घेतला. विवेक गोखले यांनी मजेशीर उखाणा घेतला. त्या नंतर स्वादिष्ट आणि रुचकर अगदी श्रावण महिन्यातील मेनू ठेवल्या मुळे fellowship घेऊन सर्वजण तृप्त झाले. त्यासाठी Fellowship टीम चे खूप खूप कौतुक..पूजा, वर्षा , अपर्णा मुटाटकर...
ह्या सर्व कार्यक्रमा चे नियोजन President रो. निवेदिता, Event Director रो. तृप्ती, Ann संगीता यांनी केले होते. तृप्तीच्या अप्रतिम सजावटीने सगळ्याचे मन मोहून गेले. संगीताचे गाणे, ड्रेस निवड आणि उत्तम Choreography ने खूपच मज्जा आणली. तुमच्या सहकायनिच हा कार्यक्रम अविस्मरणीय व देखणा झाला. खूप खूप धन्यवाद.
Ann संगीता व Ann धनश्री यांनी सुंदर डान्स, खेळ बसवून घेतले. त्यांना खूप खूप धन्यवाद. खेळामध्ये भाग घेणाऱ्या सर्व मैत्रिणींना व हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ज्यांनी प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष मदत केली त्या सर्वांना खूप खूप धन्यवाद.

**रो. निवेदिता मुळे**
**प्रेसिडेंट, RCP सहवास**



## Weekly Meetings :

### "जागर मंगळागौरीचा"











# Weekly Meetings :

## “अथर्वशीर्ष पठण ”

गुरुवार 22 ऑगस्ट, २०२४ रोजी रो. महेश व सुचेता सप्तर्षी यांनी आयोजित केलेला अथर्वशीर्ष कार्यक्रम खूप छान झाला. उभयतांनी त्यासाठी घेतलेली मेहनत दिसून येत होती. सभासद देखील मोठ्या संख्येने आवर्जून उपस्थित होते. रो. प्रकाश पटवर्धन यांनी रो. महेशजींचा पगडी व उपरणे देऊन सत्कार केला. रो. नंदकुमार घुले यांनी ४ वेदांची थोडक्यात माहिती सांगितली. त्यानंतर सुग्रास भोजन घेऊन तृप्त होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.





# District Membership Seminar :

25th August, 2024 it was a very fabulous Membership seminar. Well organised, well planned, superb venue, delicious menu..Everything was in place.

Very happy to share that in today's Membership SeminarRCP Sahawas grabbed 4 Awards in membership.

1. Highest Membership of 5 years.
2. Platinum Award in Membership Growth
3. Platinum Award in Women Membership Growth
4. Platinum Award in Partners converted to Rotarians. Three cheers for RCP Sahawas !!!!

Thank you all members for their contribution in achievement of the club.

For this Seminar Rtn. Vivek Joshi, Rtn. Nitin Tilak, Rtn. Purushottam, Rtn. Jayashree Dhupkar, Rtn. Varsha Kulkarni were present. Thanks to all..

Together We Can...

**Rtn. Nivedita Mulay**
**President, RCP Sahawas**



# Weekly Meetings :

## "समर्थांचे नेटवर्किंग"

First Shukrangan Meeting of 11 Clubs...
RCP सहवास ने आयोजित केलेल्या शुक्रांगण मध्ये १० Clubs ना बरोबर घेऊन केलेला कालचा श्री. समीर लिमये यांचा समर्थांचे नेटवर्किंग हा कार्यक्रम अतिशय सुंदर, दिमाखदार झाला. ११ Clubs नी एकत्र येऊन हा कार्यक्रम आयोजित केला होता. प्रत्येक छोट्या गोष्टीचे केलेले उत्तम नियोजन, ११ Club Presidents मधील उत्तम Coordination म्हणजे हा कार्यक्रम होता. रेकॉर्ड ब्रेक २२० सभासदांची उपस्थिती होती. श्री समर्थांचे त्या काळातील विचार आजही कसे तंतोतंत लागू होतात हे समीर लिमये यांनी अतिशय प्रभावीपणे सांगितले. त्या काळातील समर्थांचे नेटवर्किंग कौशल्य आजही जसेच्या तसे लागू होते. समर्थांच्या २०५ मनाच्या श्लोकांपैकी रोज एका श्लोकाचा जरी आपण विचार केला तरी आपले जीवन अधिक आनंदी होईल.
समर्थांनी दासबोध, मनाचे श्लोक यात उत्तम संघटन कौशल्य , नेतृत्व गुण, Strategic planning, Dress code, Branding, Team work ....याबद्दल खूप छान सांगितले आहे. ३५० वर्षांपूर्वी समर्थांनी ह्या सगळ्या गोष्टींचा विचार केला होता, हे बघून खरोखरच समर्थांपुढे नतमस्तक व्हायला होते. ते विचार आपल्या रोटरी संस्थेला ही तंतोतंत लागू होतात. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व ११ Clubs ना आपण active participation ची व स्टेज वर येण्याची संधी दिली.
या कार्यक्रमात आपल्या क्लब चे Teamwork देखील ठळक पणे दिसून येत होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठीअजय जी, सुधीर, विवेक जी यांची खूप मदत झाली. त्यांनाखूप खूप धन्यवाद. पुरुषोत्तम, अपर्णा मुटाटकर, पल्लवी, धनश्री, सुप्रिया, श्री, वर्षा , अजित जोशी यांनी Stage , Welcome , Fellowship ह्या जबाबदाऱ्या खूप छान पार पडल्या. सर्वांना खूप खूप धन्यवाद
Team Sahawas Rocks !!!

**रो. निवेदिता मुळे**
**प्रेसिडेंट, RCP सहवास**








# Weekly Meetings :

## अभिप्राय - "समर्थांचे नेटवर्किंग"

RCP Sahawas has done it again. Setting new benchmark, scaling newer heinght is becoming common with Sahawas for last few years. An eminent Corporate Kirtankar from Mumbai, Mr. Sameer Limaye set the ball rolling in Corporate vocabulary by quoting exclusively from Samarth Ramdas Swami's magnum opus, दास बोध & मनाचे श्लोक written almost about 350 years back. What he was talking about was all about - Vision & Mission, Strategic planning, Leadership Development, Communication skills.

Negotiation, Interpersonal Relationship and how the combination of all these so called management tactics helps organisation in their growth and development.

The occasion was Friday Fellowship meeting under the banner of SHUKRAANGAN where 11 clubs joined in synery with energy and enthusiasm. Full house at Punyaai Sabhagruh hall, Paud Road was wonderful sight to behold.

What does all these networking skills do finally for any individual or institution ? It helps build BRAND.

On this occasion, Rotary's Vocational Service Excellence Award was also conferred upon Sameer Limaye on his noble Contribution in spreading message of Samarth Ramdas Swami particularly among young Entrepreneurs, student by his Corporate Kirtan. District Governor Rtn. Sheetal Shah and District Vocational Director Rtn. Madhumita Barve were specially present today to do the honour.

Hearty congratulations to our President Rtn. Nivedita Mulay and all other President of 11 other Rotary Clubs for their fabulous collaborations. If you want to go fast, go alone. If you want to far, go together and this is what's the idea of SHUKRAANGAN is all about.

TEN COMMANDMENTS for Life worth living and NETWORKING –

1) राखावी बहुतांची अंतरे । भाग्य येते तद्नंतरें । ऐसी ही विवेकाची उत्तरे । ऐकणार नाही ।

२) काया बहुत कष्टवावी । उत्कट कीर्ति उरवावी । चटक लावुनी सोडावी काही एक ।

३) सामर्थ आहे चळवळीचे । जे जे होईल त्याचे । पण तिथे भगवंताचे अधिष्ठान पाहिजे ।।

४ ) दुसऱ्याचे दुःखे दुखावे । दुसऱ्याचे सुखे सुखावें । अवघेचि सुखी असावे । ऐसी वासना ।।

५) अभ्यासे प्रगट व्हावे । नाही तरी झाकोन असावे । प्रगट होऊन नासावें । हे बरे नव्हे ।।

६) तो परोपकार करितोची । तो पाहिजे ज्याला त्याला । मग काय उणे त्याला । भूमंडळी ।।

७) जितुके आपणास ठावे । तितुके हळूहळू शिकवावे । शहाणे करुनि सोडावी । बहुत जन ।।

८ ) कीर्ति पाहता सुख नाहीं । सुख पाहतां कीर्ति नाही । केल्याविण काहीच नाही । कोठे त्हीं ।।

९) बहुतांचे मुखी उरावे । बहुतांचे अंतरी भरावे । शहाणे करावे जन । पतित करावे पावने ।।

१०) जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभार बुडाला । जो आपणची कष्टत गेला । तोचि भला ।।

**Rtn. Ajay Mutatkar**
**Club Admin Director**



सहवासीय संप्रदाय...कार्यक्रम सेवेत सहभागी...

# Weekly Meetings :

## अभिप्राय - "समर्थांचे नेटवर्किंग"

शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे । वसिष्ठा परी ज्ञान योगीश्वराचे॥
कवी वाल्मिकी सारिखा मान्य ऐसा। नमस्कार माझा सद्गुरु रामदासा॥
॥ जय जय रघुवीर समर्थ॥

हा श्लोक म्हणून श्री समीर लिमये यांनी काल अकरा रोटरी क्लबने शुक्रांगण उपक्रमाच्या अंतर्गत आयोजित केलेल्या "समर्थांचे नेटवर्किंग" या कार्यक्रमाची सुरुवात केली. हा श्लोक लहानपणापासून ऐकत आलोय पण वैराग्य, ज्ञान आणि कवित्व या शब्दांचा अर्थच न समजण्याच्या वयात त्या सगळ्याचा अर्थ रामदासस्वामी हे एक महान सत्पुरुष होऊन गेले एवढाच तेंव्हा समजला होता. सखोल अभ्यासातून ज्ञान संपादन करता येते, कवीची प्रतिभा जन्मजात असते आणि हे दोन्ही गुण अंगात असलेल्या माणसाला अहंभाव असू नये, कसलीही आसक्ती असू नये असे वैराग्य प्राप्त करण्यासाठी स्वतःवर केवढे नियंत्रण मिळवावे लागले असेल! हे तीन गुण ज्या समर्थांच्या अंगी एकवटले होते ते अलौकिक आणि अशा महान व्यक्तिमत्वाच्या श्री रामदासांनी लिहिलेल्या मनाचे श्लोक व दासबोध यांचे वाचन करून आजकालच्या धकाधकीच्या - अस्थिरता-अनिश्चितता -असमाधान आणि भीती अशा वातावरणात कसं वागावं याचा सर्वांगीण विचार, शिकवण व आपल्यात एक सकारात्मक परिवर्तन घडून येण्यास निश्चितच सामर्थ्य येईल.

मन हा न दिसणारा शरीराचा अविभाज्य पण चंचल भाग - त्याचं स्वरूप आपण पाहू शकत नाही -चित्रित करू शकत नाही -पण समर्थांनी मनाच्या श्लोकातून त्याची सर्व लक्षणं लिहून ठेवली आहेत. आणि हे श्लोक फक्त लहानपणी वाचावे असं नाही. ते कोणत्याही वयात वाचावेत - त्याने वाणी शुद्ध होते - नवीन शब्दांची ओळख होते -गेयता वाढते. विनोबा भावेंनी मनाच्या श्लोकांना "मनाची उपनिषदे" असं म्हणलंय!

मनाचे श्लोक व दासबोध याबद्दल बोलताना समीरजीनी समर्थांनी २४ ते ३६ या वयात केलेल्या तीर्थाटनाने आपल्या प्रवचनाला सुरवात केली. या तीर्थाटनामुळे समर्थांना एक संपन्न जीवानुभव मिळाला - आपणही असं तीर्थाटन करायला हवं पण ते पर्यटन म्हणून नाही तर जगाकडे मोकळेपणे - डोळे उघडे ठेवून - देश-वेष-स्थिती-काळ यांचं भान ठेऊन एक ज्ञान मिळवण्याच्या उद्दिष्टाने. असं भ्रमण केल्यामुळे बाहेर काय काय नवीन आहे -आपणाकडे जे नाही ते इतरांकडून कसं मिळवता येईल याचा अभ्यास होतो. मग ते करताना आपोआपच नैसर्गिक-भौगोलिक-सामाजिक - राजकीय-आर्थिक गोष्टीचा विचार -चिंतन होईल.

श्रीमंत होणं चुकीचं नाही पण ते होताना आपल्याबरोबर इतरांचंही भलं होईल हे बघितलं पाहिजे - ते एक प्रकारचं नेटवर्किंगच.

श्रोत्यांनी कसं ऐकावं हे एक कला आहे - फक्त बोलू नये - दुसऱ्याचं ऐकावं - म्हणजे नवीन कल्पना मिळतात - सर्वांना बरोबर घेऊन पुढे जायला हवे - "सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो करील तयाचे॥ परंतु तेथे भगवंताचे। अधिष्ठान पाहिजे॥" यातून आपल्याला ते अधिष्ठान मिळतं . जगामध्ये फक्त नकारात्मक गोष्टी असतात असं नाही - पण तिच्यावर मात करणारी सकारात्मकता मनाच्या श्लोकातून या जीवनाभुवातूनच मिळते.

" आधी मजला काही तरी देव , मग तुला दिसेल देव " असं न होता निरिच्छपणे जगाकडे -देवाकडे पाहायला हवं . त्यातूनच भय -भ्रम आणि संशय यातून बाहेर येण्याचा मार्ग समर्थ देतात.

विचारांनी समृद्ध व्हायला हवं - ते करण्यासाठी - पहिल्यांदा लिहिणे - मग वाचणे - आणि सांगणे - यात सर्वात महत्वाचं आहे ते वाचन , कारण लिहायच्या आधी वाचन हवं - लिहिल्यावर ते बरोबर आहे का नाही ते पाहायलाही वाचन आणि अर्थ सांगण्यासाठी पुन्हा वाचनंच हवं !!

समर्थांचं नेटवर्किंग समजावताना समीरजीनी सांगितलं..श्रवण भक्ती म्हणजे " ऐसें हें अवघेंचि ऐकावें| परंतु सार शोधून घ्यावें | असार तें जाणोनि त्यागावें| या नांव श्रवणभक्ति ||"

श्रोत्यांनी कसं ऐकावं ही एक कला आहे - फक्त बोलू नये - दुसऱ्याचं ऐकावं - म्हणजे नवीन कल्पना मिळतात - सर्वांना बरोबर घेऊन पुढे जायला हवे - सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो करील तयाचे॥ परंतु तेथे भगवंताचे। अधिष्ठान पाहिजे॥" यातून आपल्याला ते अधिष्ठान मिळतं . आपल्यात काय अवगुण आहेत हे जाणून त्याचा साक्षात्कार होण्यासाठी श्रवणाबरोबरंच ग्रंथांचे वाचन-चिंतन-मनन आवश्यक आहे .

श्रवणाबरोबरच बोलण्याच्या भानाचं महत्व सांगताना समीरजी म्हणाले की व्यक्त्यानेही आपण बोलताना श्रोत्यांचं भान ठेवायला हवं , विषय श्रोत्यांसमोर ठेवताना श्रोत्यांची स्थिती -प्रतिसाद पाहून विषय रंगवायला हवा.

समर्थांनी परमार्थात त्याकाळात ११०० मठ स्थापन केले होते - त्या साडे तीनशे वर्षांपूर्वीच्या काळात त्या मठांचे नेटवर्किंग कसं असेल ते आजकालच्या कार्पोरेट जगात शिकण्यासारखं आहे. यातून व्यक्ती महत्वाची नाही तर कार्यप्रणाली महत्वाची हे अजूनही सज्जनगड आणि इतर सर्व मठांकडे पाहून कळतं . कोणत्याही संस्थेत आल्यावर आपण इथं का आहोत याचं भान ठेवायला हवं - आपणाबरोबर इतरांची उपस्थिती - प्रगती पाहायला हवी - नेटवर्किंग म्हणजे फक्त एकमेकांना कार्ड देणं -हाय हॅलो करणं नाही - एकमेकांना समजून घेणं आहे - त्यातून संघटन तयार होतं - व्हिजन मिशन तयार होतं -ब्रॅण्डिंग होतं - मठातील महंतांच्या छाटीचा उपयोग मार्केटिंगसाठी - ब्रॅण्डिंग म्हणून रामदासींनी कसा केला हे रंजक आहे. मठ वाढवताना दर चार वर्षांनी समर्थ मठाधिपतींची शिवथर घळीत बैठक ठेवायचे - हातचं न राखता बुद्धी-युक्तीने नवीन महंत कसे घडवले असतील हे आजच्या कार्पोरेटने शिकण्यासारखे आहे. आपण अमरपट्टा घेऊन आलेलो नाही - त्यामुळे काम पुढे जाण्यासाठी पुढची पिढी घडवणं महत्त्वाचे हे समर्थ आपल्याला सांगतात.

# अभिप्राय - "समर्थांचे नेटवर्किंग"

मारुतीच्या पूजेतून ग्रुप लीडर कसे तयार झाले हे ही एक उदाहरणंच . "आधीच शिकोनी शिकवी तोच पावे श्रेष्ठ पदवी " यातून समर्थांनी नेता कसा बनतो हे सांगितलं - आणि हे करताना त्यानं मी कोणी वेगळा आहे - मोठा आहे असं न वागता त्यांच्यातलाच होऊन विवेकानं राहणं हे संघटना पक्की होण्यासाठी महत्वाचं आहे. यातून आत्मीयता वाढते - लहानमोठा भाव जाऊन आपलेपणा वाढतो. काहीतरी मिळण्यासाठी - मिळवण्यासाठी कधीतरी अपमान गिळायला लागतो -कधी सांभाळून समजून घ्यायला लागतं . " दुसऱ्याच्या दुःखे दुःखी व्हावे , परसंतोषे आनंदी व्हावे " ... चांगल्या भाषेत एकमेकांना सामावून घेतलं पाहिजे. मन निर्मल असावे - मनमोकळं असावं - मग दुसऱ्याच्या मनात काय चाललंय हे समजतं - त्याप्रमाणे वागणं बदलतं - ओलावा वाढतो - याचाच उपयोग व्यवसायात लोकांना -परिस्थितीला ओळखायला होतो. समर्थ ज्या ज्या भागात गेले तिथल्या भाषा शिकले - नवनवीन भाषा शिकाव्यात - " दिसामागे काहीतरी लिहीत जावे .. प्रसंगें अखंडित वाचित जावें" दररोज काही लिहावं - वाचावं म्हणजे विचारांचा निचरा होतो - याने आपण बहुश्रुत होतो - एक दृष्टिकोन तयार होतो - आपलं वागणं आपल्या विचारांशी सुसंगत होतं - वागण्यात-बोलण्यात तारतम्य येतं - प्रसंगानुरूप आचरण झाल्यामुळे सुसंगती येते. साक्षेपी वागल्यामुळे परिपक्वता येते.

दुसऱ्या माणसाने आपल्याकडे प्रेमानं - शंका विचारायला - अडीअडचणीला मदतीला यावं असं आपलं वागणं प्रांजळ असावं - यानं नेटवर्किंगला आवश्यक असं कम्युनिकेशन - संवाद वाढतो.

समर्थांनी भिक्षा आणि भीक यातला अर्थ सांगितला - भिक्षेने ओळखी वाढतात - लक्षात ठेवावे भिक्षा म्हणजे याचिका नाही - रोज पाचंच ठिकाणी भिक्षा मागावी आणि रोज नवीन ठिकाणी जावं , म्हणजे नवीन ओळखी वाढतात - अंदाज वाढतो - भ्रम दूर होऊन आपली आपल्याला ओळख किंमत कळते - मार्केटिंगसाठी किती उपयोगी आहे आणि नेटवर्किंगही वाढतं .

समीरजींचं व्याख्यान चालू असताना दीड तास कसा उलटून गेला कळलं नाही - अजून तासभरही ते चाललं असतं - पण कितीही ऐकलं तर कमीच त्यामुळे आपण दासबोधाचं वाचन चालू ठेवावं त्यामुळे...

आपलं व्यक्तिमत्व विकास आणि स्वावलंबनाची सवय यामुळे परिस्थितीवर नियंत्रण करण्याची क्षमता वाढेलपरस्परावलंबत्वाची योग्य जाणीव होऊन सहकार्याची भावना वाढेल . इतरांच्या मदतीने परिस्थितीवर मात करण्यासाठी योग्य दिशा मिळेल.श्रवण -चिंतन-मनन यानं योग्य तत्वज्ञानाची स्पष्ट दृष्टी मिळून आपल्या नियंत्रणाबाहेरील परिस्थितीलाही तोंड देण्याची क्षमता वाढेल.

या सर्व गोष्टींमुळे.. " क्रिया करून करवावी I बहुतांकरवी I I "
अशी मानसिकता निर्माण करणं हेच तर समर्थांचे नेटवर्किंग
जय जय रघुवीर समर्थ I I

**रो. राहुल लाळे**



# Visit to International Rotary Club

During our London tour we visited Rotary clubs there. President Rtn. Kim Biggs, Secretary Rtn. Paul and Treasurer  Rtn. Terry gave both of us a very warm welcome. We exchanged our club flags. They hosted our dinner and drinks as well. We discussed our clubs projects done so far since it's formation and they told us about their charity. It was a good evening spent with them over drinks and dinner. They were impressed with the club's  project of Advanced Artificial Modular Limb. I requested them to fund us for at least 25 to 30 limbs. They seemed to be positive but their problem is the same as ours. Always short of big funds. It's a very small Club of 15 members. But they were very warm senior people. The eldest member Rtn. Jerry was 90 years old and Ann Veronica was 86. All of them extended us a very friendly welcome. Let's see how we can get associated with them in time to come.





We visited another club known as Rotary Club of Carshalton. Met the Secretary Maria Connor and Treasurer Andrew Barnard and other club members. They had a synergy meeting with another club known as Rotary Club of Sutton. So we could interact with those members as well. What I gather from interacting with Rotary Clubs in London is, they primarily meet for fellowship and they don't go after the projects like we do in our club. They do fund raising events and do the charity. Their clubs work differently than our clubs. Quite surprising !!!!!

**Rtn. Mahendra Chitte**





# WOMEN in Rotary

## Events List

### JUL 24

**1. LEGAL LIGHT : WOMEN'S RIGHTS AND SAFETY**
Date : 31st July
Type
Area
Host ... Pune Yuva
Contact: Smeeta Shitole | 9923 811 212
Registration Charges: ₹99 ONLY
OFFLINE
HOUSEFULL

### SEP 24

**3. GEET GATA CHAL: ANTAKSHARI**
OFFLINE
Date : TBD
Type: Hi Tea
Area : PMC
Contact: Smeeta Shitole | 9923 811 212

**4. CYBER SAFE : A GUIDE TO CYBER SECURITY**
Date : 18th Sept, Wed
ONLINE

**5. CANVA & INSHOT MAGIC**
Date : 25th Sept, Wed
Type: Breakfast
Area : PMC
Host Club : RCP Gandhi Bhavan
Contact: Shyamal Marathe | 7709 169 194
Registration Charges: ₹199 ONLY
OFFLINE

### NOV 24

**8. GEET GATA CHAL: ANTAKSHARI**
OFFLINE
Date : 13th Nov, Wed
Type: Hi tea
Area : Daund
Host Club: RC Daund
Contact: Smeeta Shitole | 9923 811 212

**9. SHIMMER & SHINE : A MAKE OVER JOURNEY**
OFFLINE
Date : 20th Nov, Wed
Type: Breakfast & lunch
Area : PMC
Contact: Sonia Menghani | 9175 314 022
Registration Charges: ₹299 ONLY

**10. SAFE BANKING : MASTERING ONLINE BANKING**
Date : 27th Nov, Wed
ONLINE

### AUG 24

**2. CHAT GPT : ... RTUAL ASSIST...**
Date
ONLINE
HOUSEFULL

### OCT 24

**6. CLICK & CREATE MAGIC: MOBILE PHOTOGRAPHY**
Date : 16th Oct, Wed
Type: Hi Tea
Area : PCMC
Host Club : PC Pimpri Elite
Contact: Aparna Mahajan | 9823 032 757
Registration Charges: ₹99 ONLY
OFFLINE

**7. SHE CONNECT : LEARNING LINKEDIN & TWITTER**
Date : 23rd Oct, Wed
ONLINE

### DEC 24

**11. FOREVER FIT : THE ART OF YOUTHFUL LIVING**
Date : 4th Dec, Wed
Type: Lunch
Area : Panvel
Host Club : RC Panvel
Contact: Suchita Jagwani | 9623 122 292
Registration Charges: ₹199 ONLY
OFFLINE

**12. BOOST YOUR HAPPINESS QUOTIENT**
Date : 18th Dec, Wed
ONLINE

## DISTRICT MEMBERSHIP TEAM RY 24-25 INITIATIVE

JOIN ROTARY
Scan this QR code to get connected with membership team

Green Colour: Online Events | Orange Colour: Offline Events

page 1 of 2



# WOMEN in Rotary

## Events List

### JAN 25

**13. DECODE FOOD LABELS & EAT BETTER**
Date : 8th Jan, Wed
ONLINE

### FEB 25

**14. PEACEFUL PATH: MASTERING STRESS & SLEEP** — OFFLINE
Date : 12th Feb, Wed
Type: Breakfast
Area : PMC
Contact: Suchita Jagwani | 9623 122 292
Registration Charges: ₹99 ONLY

**15. WILD LIFE SAFARI @PHOTOGRAPHY** — OFFLINE
Date : 20 to 22 Feb
Area : Pench
Contact: Aparna Mahajan
+91 9823 0 32 757

**16. MOBILE DE ADDICTION : RECLAIM YOUR TIME**
Date : 26th Feb, Wed
ONLINE

### MAR 25

**17. HEALTHY HORMONES : BALANCING WOMEN HORMONES**
Date : 12th March, Wed
ONLINE

**18. FACIAL FITNESS : FACE YOGA**
Date : 26th March, Wed
ONLINE

### APR 25

**19. SPLASH N DANCE : AQUA ZUMBA** — OFFLINE
Date : 9th April, Wed
Type: Hi Tea
Area : PMC
Host Club : RC Pimpri
Contact: Smeeta Shitole | 9923 811 212

**20. LET YOUR NUMBERS GUIDE YOU : NUMEROLOGY INSIGHT**
Date : 23rd April, Wed
ONLINE

### MAY 25

**21. HEARTFELT BONDS : BUILDING MEANINGFUL RELATIONSHIP**
Date : 14th May, Wed
ONLINE

### JUN 25

**22. EMPOWER HER : RESTART YOUR CAREER**
Date : 11th June, Wed
ONLINE

**"Where there is a WOMAN there is MAGIC"**

## DISTRICT MEMBERSHIP TEAM RY 24-25 INITIATIVE

**JOIN ROTARY**
Scan this QR code to get connected with membership team

For all the online events Contact:
Suchita Jagwani | +91 9623 122 292
Smeeta Shitole +91 9923 811 212



Green Colour: Online Events | Orange Colour: Offline Events

page 2 of 2

# Basic Education and Literacy

Imagine a society with low literacy level, deprived of basic education and literacy, it will only bring about inconsistent, abnormal dialect, baseless communication amongst the various grades of the society. For the wellbeing of the society, it is important that an individual is able to understand and comprehend the flow of its norms, values and culture. For the wellness of the society, it is equally important that its population shows equity in diversity, and attains an inclusive approach for employment and has economic continuity and competitiveness. Many developing countries for a progressive economic society have adopted a basic education and literacy model, an important aspect of connecting with the members, to lessen the urban rural divide, further it is also to develop an inquisitive, scientific mindset, which is more evolved with the society; a critical thinker and problem solver.
The terms of basic literacy are straight forward and very simple - It is to know how to read, write and speak a language, to be able to communicate and able to propagate optimism in the society. Basic literacy revolves around maths and numerals, attaining proficiency with numbers, being calculative quick thinker. Basic literacy generates interest, attaining work-life balance to a high enough level, to becoming a pro in confidence and self-esteem.
In India the flow of literacy in various states of India coincides with basic literacy norms and is coherent with the SDG goals for sustenance and sustainability. The SDG 4 goal states - "Ensure inclusive and equitable quality education and promote lifelong learning opportunities for all".
In India, over the years basic literacy has been tremendously successful – a bridge for communication, offering a more comprehensive job scenario. Basic literacy has advanced further to the rural areas with rural programmes and campaigns e.g adult Literacy programmes, E-Learning programmes, Apprentice skills programmes etc.
"Rotary ki Smart Pathshala" is one of the initiatives of the many initiatives taken by rotary district 3131 to improve the literacy level of the rural, and rural suburbs.

**Smart teachers training**- the teachers are made efficient in digital literacy. They are made earnest in their field. They are equipped with what's new and what is expected of them in the current scenario. The norm is training and various developmental programmes, including gaining thorough knowledge in National Education Policy (NEP). It is necessary that every teacher apart from their daily schedule, indulges in new, competitive models, helping others to be more aware and competitive.

**Smart E-Learning class –** Coding, AI, Computer programming are the gainers of the whole employment scenario. The fastest computer, the fastest of the calculations, achieving maximum accuracy in minimum time, to be a best thinker, all the wiseness effectively with the help of SMART E-Learning class. Swayam has offered a model which is happening in many of the schools. A child is with the advanced technology, is aware of what is happening in other part of the world, an engagement of togetherness, in different environment.

**Smart Adult Literacy** - Adult literacy campaign a programme to develop the most neglected part of the rural society. The campaign which can be easily picked up by the schools or the Anganwadis to be taught to the society, as to develop efficiency and a good social connect. It is also to build them as a respectable and contributing community of the society e.g Vidya model and Diksha Mode.

**Smart Child Development –** Basic Literacy strictly believes in overall development. All studies and no play can make Jack a dull boy. It is important for a child that he is a quick learner at the same time is able to respond in less time. It is the practical applicability which is the buzz hour. Quick applications, psychometric tests and aptitude tests are readily available for a normal and abnormal child.

**Smart Happy Anganwadi –** a step to the big world. The little tots have some time to warm up, to build their words to the large world in an Anganwadi. A very common setup, a must for the child's early development, Smart Happy Anganwadi is offered. The child is freshened up, built for the excellent world. The Anganwadis have specially trained teachers, who facilitate the small world for the big. The child is provided with all the tools and material to build their dream world.

**Rtn. Ruma Agwekar,**
**CEO, Petals Education and Development**

## कॉलेज विद्यार्थ्यांसाठी 'व्हिडिओ फिल्म बनवणे' स्पर्धा

रोटरी इन्टरनॅशल डिस्ट्रिक्ट ३१३१च्या रोटरी ग्रीन सोसायटी तर्फे कॉलेज विद्यार्थ्यांसाठी 'पर्यावरणाविषयी जागरुकता' निर्माण करण्यासाठी 'व्हिडिओ फिल्म बनवणे' अशी स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे.

यासाठी पुणे आणि रायगड येथिल सर्व कॉलेजेस भाग घेऊ शकतात. ही स्पर्धा ज्युनिअर आणि सिनिअर कॉलेज विद्यार्थ्यांसाठी आहे. ५ ते १० विद्यार्थ्यांचा एक गट असेल. विद्यार्थ्यांनी पर्यावरण विषयामध्ये एका विषयावर 'व्हिडिओ फिल्म बनवायची' आहे : उदा. १) सोलर २) रेन वॉटर हार्वेस्टिंग ३) वेस्ट मॅनेजमेन्ट ४) एनर्जी सेव्हिंग एक्विपमेन्ट ५) कॉम्पोस्टिंग ६) बायोगॅस ७) टॅरेस गार्डनिंग ८) ऑरगॅनिक प्लॅन्टेशन इ.

व्हिडिओ बनवतानाचे विद्यार्थ्यांसह फोटो, काही व्हिडिओ आणि फायनल फिल्म पाठवावी. जानेवारी २०२५मध्ये पुण्यात एक एक्स्पो आयोजित करण्यात येईल. त्यावेळी यातील निवडक फिल्म्सना पुरस्कार प्रदान करण्यात येतील आणि त्यांच्या फिल्म्स एक्स्पोमध्ये दाखवण्यात येतील. सर्व कॉलेजेसना स्पर्धा-सहभागासाठी प्रशस्तीपत्रे देण्यात येतील.

सूचना :

१) व्हिडिओ शुटिंगकरता फक्त मोबाईल वापरावा.

२) फायनल फिल्म फक्त तीन मिनिटांचीच असावी.

३) मॉडेल्सचे फोटो, व्हिडिओज आणि फायनल फिल्म १५ डिसेंबर २०२४ पर्यंत मो.क्र. ९८५०६ ६०७८२ व्हॉट्सॲप करावेत अथवा rotary.green.competition3131@gmail.com वर मेल करावेत.

४) काही शंका असल्यास वरील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

**रो. जयश्री धुपकर**
**आरसीपी सहवास**
**मो. क्र. ९८५०६ ६०७८२**

---

## शालेय विद्यार्थ्यांसाठी 'मॉडेल बनवणे' स्पर्धा

रोटरी इन्टरनॅशल डिस्ट्रिक्ट ३१३१च्या रोटरी ग्रीन सोसायटी तर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी 'पर्यावरणाविषयी जागरुकता' निर्माण करण्यासाठी 'मॉडेल बनवणे' अशी स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे.

यासाठी पुणे आणि रायगड येथिल सर्व शाळा भाग घेऊ शकतात. ही स्पर्धा ७वी, ८वी आणि ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी आहे. ५ ते १० विद्यार्थ्यांचा एक गट असेल. विद्यार्थ्यांनी पर्यावरण विषयामध्ये एका विषयावर मॉडेल बनवायचे आहे : उदा. १) सोलर २) रेन वॉटर हार्वेस्टिंग ३) वेस्ट मॅनेजमेन्ट ४) एनर्जी सेव्हिंग एक्विपमेन्ट ५) कॉम्पोस्टिंग ६) बायोगॅस ७) टॅरेस गार्डनिंग ८) ऑरगॅनिक प्लॅन्टेशन इ.

रोटरी इन्टरनॅशल डिस्ट्रिक्ट ३१३१च्या रोटरी ग्रीन सोसायटी तर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी 'पर्यावरणाविषयी जागरुकता' निर्माण करण्यासाठी 'मॉडेल बनवणे' अशी स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे.

यासाठी पुणे आणि रायगड येथिल सर्व शाळा भाग घेऊ शकतात. ही स्पर्धा ७वी, ८वी आणि ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी आहे. ५ ते १० विद्यार्थ्यांचा एक गट असेल. विद्यार्थ्यांनी पर्यावरण विषयामध्ये एका विषयावर मॉडेल बनवायचे आहे : उदा. १) सोलर २) रेन वॉटर हार्वेस्टिंग ३) वेस्ट मॅनेजमेन्ट ४) एनर्जी सेव्हिंग एक्विपमेन्ट ५) कॉम्पोस्टिंग ६) बायोगॅस ७) टॅरेस गार्डनिंग ८) ऑरगॅनिक प्लॅन्टेशन इ.

सूचना :

१) मॉडेल्सचे फोटो / व्हिडिओज १५ डिसेंबर २०२४ पर्यंत मो.क्र. ९८५०६ ६०७८२ व्हॉट्सॲप करावेत अथवा rotary.green.competition3131@gmail.com वर मेल करावेत.

१) काही शंका असल्यास वरील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

**रो. जयश्री धुपकर**
**आरसीपी सहवास**
**मो. क्र. ९८५०६ ६०७८२**

## Upcoming Programmes :

**13th & 14th Sept.** - सहवास गणेशोत्सव

**16th Sept.** - Participation of RCP Sahawas in Pune Ganesh Festival.
In Music & Dance program.. CL Kulkarni, Santosh Joshi, Ajay Mutatkar, Deepa Godbole in Solo/Duet while Swati Kamatikar, Nivedita Mulay, Pallavi Ingale, Aparna Mutatkar, Sangita Pandit will be performing group song. While Sahawas ladies will be performing मंगळागौर डांस

**21st Sept.** - अथर्वशीर्ष

**27th Sept.** - Fellowship over Business meet of RCP Sahawas,
In the month of October, RCP Sahawas will be hosting seminar on Trust Compliance for District 3131..




## Birthdays in September :

2nd September - Ann Manjusha Gokhale
2nd September - Annet Dr. Sayli Gavaskar
2nd September - Annet Isha Gavaskar
3rd September - Annet Chinmay Mulay
6th September - Annet Aditya Ingale
10th September - Ann Vrushali Kulkarni
11th September - Rtn Ganesh Bawne
18th September - Annet Chintamani Vispute
19th September - Annet Priya Kothadia
21st September - Ann Supriya Patwardhan
26th September - Annet Meghana Gokhale
28th September - Rtn Sandesh Kothadia
28th September - Rtn Uday Honap




We meet every Friday 7.30 pm. at Dnyanada Prashala, DP Road, Karvenagar.